माहिती हवीय?

सौ. सुधा अ. कोर्टीकर, पंढरपूर.

□ अशोक सराफ व अलका कुबल यांनी कोणकोणत्या चित्रपटात एकत्र भूमिका केलीय?

– *तुझ्या वाचून करमेना, मधुचंद्राची रात्र, बाळाचे बाप ब्रह्मचारी, धरलं तर चावतंय, वाट पाहते पुनवेची, जसा बाप तशी पोरं, सुना येती घरा* या चित्रपटात अशोक सराफ-अलका कुबल यांनी एकत्र भूमिका केलीय.

पी.एस. म्हापसेकर, म्हापसा गोवा.

□ शंकर-जयकिशन, सी. रामचंद्र, ओ.पी. नय्यर हे एका जमान्यात चित्रपटासाठी हवी ती किंमत घ्यायचे काय?

– होय. त्यांच्या काळात कोणताही चित्रपट आजच्याप्रमाणे नायक-नायिकेच्या नावावर विकला जायचा नाही. संगीतकाराच्या नावावर विकला जायचा, त्यामुळे *आझाद*च्या वेळी सी. रामचंद्रनी संगीतकाराचा भाव सर्वात प्रथम एक लाखापर्यंत पोहोचवला. मनोज, जितेंद्र यांना त्यांना रुपेरी जीवनाच्या सुरुवातीच्या काळात आपल्या चित्रपटासाठी शंकर-जयकिशन यांचं संगीत लाभावं म्हणून अनेकदा त्यांची मनधरणी करावी लागायची. आणि मगच चित्रपटातील भूमिका त्यांना मिळायची. ओ.पी. नय्यर रॉयल्टीबाबत ठाम असायचे आणि अनेक निर्माते त्यांचं संगीत आपल्या चित्रपटाला मिळावं यासाठी त्यांना रॉयल्टी देऊन आपल्या चित्रपटासाठी घ्यायचे.

□ स्वर्गीय चंद्रकांत मांडरे यांची भूमिका असलेला शेवटचा मराठी चित्रपट कोणता?

– अमोल पालेकर यांचा *बनगरवाडी.*

□ चंद्रकांत मांडरेंनी भूमिका केलेले हिंदी चित्रपट कोणकोणते?

– ज्वाला, राजा गोपीचंद, रुक्मिणी स्वयंवर, मेरे लाल, स्वर्णभूमी, नवरंग.

□ स्वर्गीय अशोककुमार यांनी गायलेल्या गाण्यांपैकी लोकप्रिय गाणी कोणती?

– 'मैं बन की चिडिया बन के बन बन बोलू रे...' (*अछूत कन्या*), 'ना जाना किधर आज मोरो नाव चलो रे...' (*झुला*), 'एक नया संसार बसा ले...' (*नया संसार*), चल चल रे नवजवान (*बंधन*), 'धीरे धीरे आरे बादल...' (*किस्मत*), 'डोल रही है नय्या मेरी...' (*शिकारी*), 'रेलगाडी...' (*आशीर्वाद*).

□ अशोक सराफचा पहिला चित्रपट कोणता?

– *दोन्ही घरचा पाहुणा.*

□ शुभा खोटेचा पहिला चित्रपट कोणता?

– १९५४ला *शुभमंगल* या मराठी चित्रपटात भूमिका करून शुभा खोटे चित्रपटात आली. १९५५चा *सीमा* तिची भूमिका असलेला पहिला हिंदी चित्रपट.

□ अशोककुमारने एस. डी. बर्मन यांच्या संगीतात एखादं गाणं गायलंय का?

– *शिकारी* एस.डी. बर्मननी संगीत दिलेला पहिला चित्रपट. या चित्रपटात अशोककुमारच्या आवाजातच त्यांच्या संगीताची सुरुवात झाली. 'डोल रही है नैया मेरी...', 'हर दिन है नया हर रात निराली है...' ही गाणी अशोककुमारने या चित्रपटात एस.डी. बर्मन यांच्या संगीतात गायली होती.

पी.एस. म्हापसेकर, म्हापसा गोवा.

□ बिमल रायनी दिग्दर्शित केलेला शेवटचा चित्रपट कोणता?



बिमल राय दिग्दर्शित *बंदिनी* चित्रपटात नूतन-धर्मेंद्र

– बिमल रायनी दिग्दर्शित केलेला शेवटचा चित्रपट *बंदिनी.*

□ शम्मी कपूरने वैजयंतीमाला आणि बीना रायबरोबर कोणत्या चित्रपटात भूमिका केली?

– वैजयंतीमालाबरोबर *कॉलेज गर्ल, प्रिन्स* आणि बीना रायबरोबर *वल्लाह क्या बात* हैमध्ये.

निकीता साळवी, रत्नागिरी.

□ परदेशात चित्रीत करण्यात आलेला पहिला चित्रपट कोणता? नायक-नायिका, निर्माता-दिग्दर्शक कोण?

– १९५४चा *नाज* परदेशात चित्रीत करण्यात आलेला पहिला चित्रपट. नायक-नायिका अशोककुमार-नलिनी जयवंत, निर्माता-दिग्दर्शक एस.के. ओझा.

राधा सरदेसाई, मुंबई.

□ नाना पाटेकर व स्मिता पाटील यांची भूमिका असलेला मराठी चित्रपट कोणता?

– त्या दोघांनी कोणत्याही मराठी चित्रपटात कधी एकत्र भूमिका केलेली नाही. १९८७ साली त्या दोघांची भूमिका असलेला *सूत्रधार* हा चित्रपट कोल्हापुरात निर्माण झाला होता. पण कोल्हापुरात निर्माण झालेला आणि चंद्रकांत जोशी या मराठी दिग्दर्शकाने दिग्दर्शित केलेला हा चित्रपट हिंदी होता.

चंद्रकांत मावळे, नारायणगाव.

□ पितापुत्रांनी एकत्र भूमिका केलेले चित्रपट कोणते?

– *आवारा* (पृथ्वीराज कपूर-राज कपूर), *कल आज और कल* (पृथ्वीराज कपूर-राज कपूर-रणधीर कपूर), *बेजुबान* (अशोककुमार-अरुणकुमार), *दूर गगन की छाँव में, चलती का ना जिंदगी, शाबास डॅडी* (किशोरकुमार-अमितकुमार), *राजकुमार, प्यार किया तो डरना क्या* (पृथ्वीराज कपूर-शम्मी कपूर), *पवित्र पापी* (बलराज साहनी-परिक्षित साहनी), *लव्हस्टोरी* (राजेंद्रकुमार-कुमार गौरव), *आनंद और आनंद* (देव आनंद-सुनील आनंद)

ज्ञानेश्वर महाडिक, महाड

□ हिंदीतून मराठीत डब झालेले चित्रपट कोणकोणते?

– हिंदी चित्रपट मराठी प्रेक्षक पाहत असल्यामुळे ते मराठीत डब होत नाहीत. पण हिंदीपासून प्रेरणा घेऊन अनेक चित्रपट आजवर स्वतंत्रपणे मराठीत निर्माण झाले आहेत. वानगीदाखल ही काही नावे *जन्माची गाठ* १९४९ (*आरसी*), *रंगपंचमी* १९६१ (*अनहोनी*), *सोनियाची पाऊले* १९६२ (*शादी*), *अपराध* १९६८ (*एक साल*), *चोरावर मोर* १९८० (*सीता और गीता*), *नाव मोठं लक्षण खोटं* १९७७ (इंतकाम), *अरे संसार संसार* १९८१ (*मदर इंडिया*), *धुमधडाका* १९८५ (*प्यार किये जा*), *खरा वारसदार* १९८६ (स्वयंसिद्धा), *अशी ही बनवाबनवी* १९८८ (*बीवी और मकान*), *फेकाफेकी* १९८९ (*आज की ताजा खबर*) आदी.

जयश्री नंदा पुणेकर, पुणे.

□ मदर इंडिया केव्हा प्रदर्शित झाला होता? या चित्रपटाला कोणकोणते पुरस्कार मिळाले?

– मदर इंडिया १९५७ला पडद्यावर आला होता. या चित्रपटाला १९५७च्या सर्वश्रेष्ठ चित्रपटाचा फिल्मफेअर पुरस्कार मिळाला होता व नरगिसला सर्वश्रेष्ठ अभिनेत्रीचा पुरस्कार कार्लोव्ही बॅरी येथील आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात या चित्रपटासाठी नरगिसला सर्वश्रेष्ठ अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला होता. ●